पुढारी

# 'रवळनाथ'चा वार्षिक व्यवसाय ५८७ कोटी

## १ कोटी ८७ लाख नफा : एम. एल. चौगुले

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**



एम. एल. चौगुले

येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीचा एकूण वार्षिक व्यवसाय ५८७ कोटी झाला असून, १ कोटी ८७ लाखांचा निव्वळ नफा झाला आहे. कोरोनाच्या सावटामध्येही संस्थेने चांगली प्रगती केल्याचे संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

यावेळी चौगुले म्हणाले, संस्थेकडे एकूण ३४२ कोटींच्या ठेवी तर २४५ कोटींची कर्जे आहेत. खेळते भांडवल ३७८ कोटींचे असून, एकूण गुंतवणूक ११५ कोटींची आहे. रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या संस्थेने पेन्शनधारक व ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी नॅशनल टोमेटेड क्लिअरिंग हाऊस (नॅच) ही सेवा तसेच गंभीर आजारी व वयोवृद्ध ग्राहकांना घरपोच सेवा सुरू आहे. लवकरच सोने तारण व गृहोपयोगी उपकरणे खरेदी कर्ज सुविधा सुरू करीत असून शैक्षणिक कर्जाची मर्यादा २५ लाखांवरून ५० लाखांपर्यंत वाढवण्यात आली आहे. संस्थेच्या प्रगतीसाठी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घगरे यांचे सहकार्य मिळाले.

Kolhapur Edition
Apr 8, 2022 Page No. 11
newspaper.pudhari.co.in